# आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून विकासाचा झंझावात कायम;
# आणखी ०१ कोटी १९ लाख रूपयांची विकासकामे मंजूर

पनवेल(प्रतिनिधी) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे, स्मशानभुमी व अन्य मुलभूत सुविधांच्या कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान उपलब्ध झाला असून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेल विधानसभा मतदार संघातील गावांच्या विकासकामांसाठी आणखी ०१ कोटी १९ लाख रूपयांचा निधी ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून मंजूर झाला आहे.

गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामासाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामविकास राज्यमंत्री सतेज पाटील यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधा कामे विशेष अनुदानातून राज्य शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभाकडून मंजूर मिळाली असून ग्रामविकास राज्यमंत्री सतेज पाटील यांच्या सहकार्याने व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेल विधानसभा मतदार संघातील ऊसर्ली बु. (उमरोली ग्रामपंचायत) स्मशानभूमी संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे, भानघर (उमरोली ग्रामपंचायत) स्मशानभूमीचे बांधकाम, पेंधर स्मशानभूमी रोड ते बैठक हॉलपर्यंत रस्ता कॉंकिटीकरण करणे, पालेखुर्द येथे पेव्हर ब्लॉक बसविणे, ओवे पेठ येथे पेव्हर ब्लॉक बसविणे, ढोंगऱ्याचा पाडा येथे कमानीपासून शाळेपर्यंत रस्ता कॉंकिटीकरण व गटार बांधणे, वाकडी आदिवासीवाडी स्मशानभूमी जवळ पेव्हर ब्लॉक बसविणे, नावडे स्टॉप ते स्मशानभूमी पर्यंत रस्ता कॉंकिटीकरण, रोडपाली येथे बुधाजी ठाकूर यांच्या घरापासून ते यशवंत ठाकूर यांच्या घरापर्यंत कॉंकिटीकरण, रांजणवाडी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे, पडघे येथे समाजमंदिर बांधकाम व अंतर्गत रस्त्यांचे कॉंकिटीकरण, केवाळे येथे स्मशानभुमी बांधणे, तसेच तुर्भे, चिखले, भिंगारवाडी, वावंजे, टेंभोडे, खानाव, हेदुटणे या गावांमधील अंतर्गत रस्त्याचे कॉंकिटीकरण करणे, अशी एकूण ०१ कोटी १९ लाख रूपयांची विकासकामे मंजूर झाली आहेत.